# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि.१२ मार्च २०२५

जळगाव दि. १२ ( प्रतिनिधी) : जळगाव दि. १२ ( प्रतिनिधी) – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने शनिवार दि. १५ मार्च रोजी जळगाव,धुळे, नंदुरबार या तीन जिल्ह्यातील उद्योजक प्रतिनिधीसमवेत शैक्षणिक संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांच्यात अधिक सहकार्य असावे असे अधोरेखीत केले आहे. त्या-त्या भागातील उद्योगांना आवश्यक असणारे मनुष्यबळ तयार व्हावे यासाठी त्या पध्दतीचे अभ्यासक्रम विकसित करुन कौशल्यावर भर देण्यात आला आहे. कारण आता पदवी व पदव्युत्तर स्तरावर विद्यार्थ्यांना ॲ प्रेंटीसशिप बंधनकारक करण्यात आली आहे. या सर्व पाश्वभूमिवर विद्यापीठाशी संलग्नीत तिनही जिल्ह्यांमधील उद्योजकांना विद्यापीठाने संवादासाठी पाचारण केले आहे.

शनिवार दि. १५ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता विद्यापीठाच्या गेस्टहाऊसवर कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. उद्योजकांसाठी तयार केलेला ४ वर्षांचा ॲ प्रेंटीस एम्बडेड पदवी अभ्यासक्रम, उद्योगांमध्ये १ वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची संधी तसेच ३ ते ६ महिन्यांचे कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम यावर या बैठकीत चर्चा होणार असून उद्योजकांच्या सूचना ऐकल्या जातील. विद्यापीठाच्या करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती उद्योजकांना दिली जाईल. या चर्चेतुन धोरणात्मक रोड मॅप तयार करण्यास दिशा मिळेल अशी अपेक्षा आहे.

या संवादासाठी प्लास्टिक.पीव्हीसी, कृषी, अन्नप्रकिया, इलेक्ट्रीकल,ॲ टो, फार्मा, केमिकल्स आणि सेवा क्षेत्रातील उद्योजक प्रतिनिधींना विद्यापीठाने निमंत्रित केले आहे. अशी माहिती नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य मंडळाचे संचालक डॉ.राजेश जवळेकर यांनी दिली.

बातमी क्र. २

जळगाव दि. १२ ( प्रतिनिधी) : नोएडा येथे पार पडलेल्या ३८ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सवात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला १ सुवर्ण व १ कास्य पदक प्राप्त झाले.

या महोत्सवात माती कला अर्थात क्ले मॉडेलिंग या कला प्रकारात देवा सपकाळे या विद्यार्थ्याने सुवर्णपदक तर समय चौधरी याने रांगोळी स्पर्धेत कास्य पदक प्राप्त केले. हे दोन्ही विद्यार्थी मुळजी जेठा महाविद्यालयाचे असून प्रा.पियूष बडगुजर यांचे मार्गदर्शन त्यांना मिळाले. कुलगुरु

प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, केसीई सोसायटीचे अध्यक्ष तथा व्य.प.सदस्य नंदकुमार बेंडाळे, राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्राचार्य एस.एन.भारंबे, विद्यार्थी विकास संचालक डॉ.जयेंद्र लेकुरवाळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

बातमी क्र. ३

जळगाव दि. १२ ( प्रतिनिधी) : रेशीम उद्योग हा सहकारासोबतच शाश्वत शेतीसाठी वरदान ठरत असल्याचे प्रतिपादन प्रगतशील शेतकरी मधुकर पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेत कै.नवल आनंदा पाटील व्याख्यानमालेअंतर्गत मधुकर पाटील बोलत होते. संजय एज्युकेशन सोसायटी, नवलनगर यांनी विद्यापीठाला दिलेल्या देगणीतून कै.नवल आनंदा पाटील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. रेशीम शेती या विषयावर श्री.पाटील यांचे व्याख्यान झाले.रेशीम किड्यांच्या संगोपनाचे तंत्रज्ञान, रेशीम उत्पादनाची गुणवत्ता आणि बाजारपेठ, रेशीम उद्योगातील आर्थिक योजना यावर त्यांनी मार्गदर्शन केले.खान्देशच्या उष्ण वातावरणात रेशीमचे किडे योग्य पध्दतीने कसे वाढवता येतात याबद्दल त्यांनी माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा.भुषण चौधरी, प्रा.के.एस.विश्वकर्मा, प्रा.ए.जी.इंगळे, प्रा.पी.आर.पुराणिक, प्रा.एस.व्ही.पाटील उपस्थित होते.

बातमी क्र.- ४

जळगाव दि. १२ ( प्रतिनिधी) :राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळेत राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान कमिशन मुंबई यांच्या सहकार्याने दि.७ व ८ मार्च रोजी विज्ञान व संगणकीय तंत्रज्ञानावर आधारित ‘मंथन-२०२५’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रा.सतिष कोल्हे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. संगणक प्रोग्रामिंग स्पर्धा व प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. दिनांक ८ मार्च रोजी अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांच्या उपस्थिती समारोप झाला. प्रशाळेचे संचालक प्रा. आर.जे. रामटेक अध्यक्षस्थानी होते. यावेळी बोलतांना प्रा.डोंगरे यांनी संगणक विज्ञान आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा समन्वय साधुन विद्यार्थ्यानी प्रगती साधावी असे आवाहन केले. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. प्रश्नमंजुषा स्पर्धेत हर्षल कुंवर – प्रथम, पुजा महाजन- द्वितीय, रोहित देसले-तृतीय, निलेश पावरा- उत्तेजनार्थ हे विजयी ठरले तर संगणक प्रोग्रामिंग स्पर्धेत भावेश पाटील प्रथम, जाफर तडवी यास द्वितीय, आणि चेतन लोखंडे – उत्तेजनार्थ ठरले. या कार्यक्रमास प्रा. सतिष कोल्हे, समन्वयक प्रा.नीता

पाटील, सहसमन्वयक  डॉ. संदीप भामरे उपस्थित होते. प्रशाळेतील डॉ. अजय सुरवाडे, डॉ.मनोज पाटील, प्रा. एस.व्ही.कापसे, प्रा.राजु आमले, डॉ.घनश्याम रामटेके,राकेश गेडाम,गिरीष चाटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रेवती पाटील या विद्यार्थिनीने केले. डॉ. वृंदा पाटील यांनी आभार मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी